स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्याशाखे अंतर्गत

"लोकप्रशासन" विषयातील विद्यावाचस्पती पदवी करिता सादर करावयाचा

शोध प्रबंधाचा प्राथमिक आराखडा.

कोरोना काळात दगावलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांच्या पुनर्वसनात प्रशासनाची भूमिका विशेष संदर्भ मराठवाडा विभाग.

संशोधक:

आनंद वैजनाथ साबणे

एम. ए., एम.एड.

मार्गदर्शक :

प्रा. डॉ. बाळासाहेब सोनबा भिंगोले

एम.ए., एम.फिल., पीएच.डी

सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधन मार्गदर्शक

लोकप्रशासन विभाग

श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय वसमत, जि. हिंगोली.

संशोधन केंद्र:

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय वजीराबाद नांदेड. - ४३१६०४

जुन २०२२

कोरोनाकाळात दगावलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या पुनर्वसनात प्रशासनाची भूमिका विशेष संदर्भ मराठवाडा विभाग.

प्रस्तावना :

माणूस नवनवीन शोध लावून जसजसा प्रगती करत आहे, तसतशी नवनवीन संकटे त्यांच्यापुढे अक्राळ विक्राळ स्वरूपात उभी टाकत आहेत. माणूस जुन्या घातक आजारांचे उच्चाटन करायच्या प्रयत्नात असताना नवनवे आजार त्याच्यापुढे आव्हान म्हणून उभे राहत आहेत. अनेक प्रयत्न करून आपण देवी या विषाणूजन्य आजाराचे उच्चाटन करण्यात यशस्वी खरे, पोलिओचे निर्मूलन शेवटच्या टप्प्यात आहे.गोवर रेबीज या आजारावर आपण प्रतिबंधात्मक लस शोधून काढण्यात यशस्वी झालो. कोरोनाव्हायरस हे खरेतर काही प्राण्यांच्या शरीरामध्ये जीवनकाल व्यतित करतात. काही प्रसंगाने ते या प्राण्यांकडून माणसाकडे संक्रमित होतात आणि मनुष्यामध्ये आजार उत्पन्न करतात. कुत्रा, मांजर, वटवाघुळ, उंदीर अशा पृष्ठवंशी प्राण्यामध्ये हे विषाणू राहत अपघाताने माणसांमध्ये त्यांचे संक्रमण होते. चीनच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी 26 डिसेंबर 2019 रोजी वूहान शहरात संक्रमनिय कोरोनाव्हायरस आढळल्याची पुष्टी दिली. 30 जानेवारी 2019 रोजी जागतिक आरोग्य संघटनेने ह्या विषाणूचा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यविषयक आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे जाहीर केले.11 मार्च 2020 रोजी कोरोनाचा उद्रेक हा जागतिक महामारी असल्याचे जाहीर करण्यात आले. आज कोरोनाच्या महारोगमुळे सर्व जगाची अर्थव्यवस्था कमकुवत झाली आहे. त्यामुळे बेरोजगारी, गुन्हेगारी, मोठ्या प्रमाणात वाढली आहे. म्हणून संपूर्ण मानव जात या रोगाच्या छायेखाली आपले भयभीत जीवन जगत आहे.

कोरोनाव्हायरस हा covid-19 या नावानेसुद्धा ओळखला जातो या मधील कोरोनाव्हायरस ने संपूर्ण वुहान शहर संक्रमित झाले. त्यानंतर पुर्ण चीनमध्ये या रोगाचा फैलाव झाला आणि हळूहळू या व्हायरसने संपूर्ण जगावर आपली पकड घट्ट केली. आणि जगभरामध्ये करोनाने हाहाकार घातला. प्रत्येक देशाच्या सरकारने आपल्या देशामध्ये फैलाव होऊ नये, यासाठी प्रतिबंधक उपाय चालू केले. आणि कोरोनाव्हायरस covid-19 यांना रोखण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आहेत. तरीसुद्धा एवढ्या सगळ्या काळजी नंतरही अनेक देशांमध्ये बहु संख्यलोक या covid-19 व्हायरसमुळे प्रभावित झाले व बऱ्याच लोकांचा यामध्ये मृत्यू झाला. जगभरामध्ये कोरोनाव्हायरस प्रभावित झालेल्या लोकांची आकडेवारी प्रचंड वाढत गेली. या कोरोनाव्हायरस चा प्रभाव संपूर्ण जगावर झालेला दिसून येतो यामुळे औद्योगिक क्षेत्र कृषी क्षेत्र सेवा क्षेत्र या सर्वावर अत्यंत वाईट परिणाम केलेले आहेत.यामुळे भारत देशाचा आर्थिक वृद्धीदर कमी झालेला आहे पोलीस हा शब्द सर्वप्रथम फ्रेंच भाषेतील असून त्याचा मुलकी राजव्यवस्था असा होतो. सर्व जगात प्राचीन काळापासून नगरपालिका व इतर महत्त्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करीत असल्या कारणाने आधुनिक काळात पोलिस शब्द वापरला जातो. समाजातील लोकांचे रक्षण करणे. गुन्हेगारावर नियंत्रण ठेवणे समाजात शांतता व सुव्यवस्था ठेवणे.ही कामे प्रामुख्याने पोलीस प्रशासनाला करावी लागतात.

ऑक्सफर्ड शब्दकोशा नुसार "पोलीस म्हणजे कायदा व सुव्यवस्था ठेवणाऱ्या तसेच त्यांचे नियंत्रण करणारे घटक होय." लॅटिन भाषेत पोलीसीया याचा अर्थ पोलिसांचे राज्य होय.

पोलीस हा ग्रीक भाषिक शब्द polis या शब्दापासून उत्पन्न झाला आहे. तसेच polita या लॅटिन भाषेतील अर्थ राज्य किंवा राज्याची स्थिती किंवा अवस्था अशा अर्थाने वापरला आहे. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत कायदा व सुव्यवस्था राखण्याची महत्त्वाची जबाबदारी ही पोलिसांवरच आहे. जरी प्राचीन काळी पोलिसांची गरज एक प्रकारे वेगळ्या पद्धतीने जात असली तरी इंग्रजी राजवटीपासून त्यांचे कार्य व कार्य पद्धती यात खूप भर पडलेली आपणास पहायला मिळते.

काळात त्यांनी विविध प्रयत्न केले. इ. स. १६६८ मध्ये मुंबई हे बेट कंपनीच्या ताब्यात गेले, तेव्हा कंपनीने त्या परिसरात रात्रीच्या गस्तीसाठी एक अनधिकृत दल उभे केले. या दलासाठी कुटुंबातील एका व्यक्तीला सक्तीने पाठविण्याची तंबी दिली. १७७९ ला ४८ अधिकारी व त्यांच्या हाताखाली ४०० बंदुकधारी पोलिसांचे नवे एक दल उभे राहिले.

स्वातंत्र्यानंतर मात्र ह्याच पोलिसांच्या रचनेत खूपच बदल करण्यात आले. पोलीस प्रशासनाची कार्यपध्दती खूपच बदलली. पोलिसांची निवड ही स्पर्धा परीक्षांमध्ये करून त्यांना मार्गदर्शन पुरवून ,समाजसेवा करण्यासाठी नियुक्ती दिली जाते . भारताने लोककल्याणकारी राज्याची स्वीकृती केल्यामुळे जनतेच्या कल्याणासाठी पोलीस प्रशासन हे त्यांच्या जीवितहानी पासून ते मालमत्तेपर्यंत सर्वांचे रक्षण करते.

सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे पोलिस प्रशासनाचे ब्रीदवाक्य आहे. सज्जनांचे व चांगल्या गोष्टींचे रक्षण करणे तर खलनिग्रहणाय म्हणजे वाईट गोष्टीचे नायनाट करणे होय. त्याच ब्रीदवाक्यनुसार पोलिस कर्तव्य निभावताना दिसत होते. ताळेबंदी दरम्यान सर्वसामान्य नागरिक जीवनावश्यक आणि गरजेच्या वस्तू तसेच औषधी पासून वंचित राहू नये म्हणून अनेक ठिकाणी पोलिस यंत्रणा कार्यरत होती. तर प्रत्येक पोलिस ठाण्यात हेल्पलाइनच्या धर्तीवर हेल्पलाइन कार्यरत होते. तसेच यामुळे चौकाचौकात पोलिस दिवस-रात्र पहारा देत होते. ते केवळ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सामाजिक नियंत्रण घडवून आणणारा आधुनिक समाजातील प्रभावी घटक म्हणजे पोलीस ज्या समाजामध्ये नियंत्रण घडवून आणले जाते. त्या समाजातील नागरिक हा देखील महत्त्वाचा घटक आहे. पोलिसांच्या भूमिकेच्या संदर्भात वयाचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. सतत करावा लागणारा बंदोबस्त, गुन्हेगारांचा तपास, शारीरिक दगदगीची कामे त्यामुळे कमी वयातच त्यांना अनेक शारीरिक व्याधींना तोंड द्यावे लागते. त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे अवेळी जेवण अपुरी झोप सतत शरीरावर व मनावर परिणाम दिसतो त्यामुळे समाज व्यवस्थेमध्ये पोलिसांना बद्दल खूप मोठे आणि आदराचे स्थान निर्माण झाले आहे. कोविड 19 च्या कालावधीमध्ये सामान्य जनतेची सेवा करून पोलिस प्रशासनाने जगासमोर एक आदर्श ठेवला आहे.

देशात घडणाऱ्या अपप्रवृत्तीवर नियंत्रण आणून कायद्याचे राज्य घडविण्यासाठी कायद्याच्या चौकटीत राहून कामे करणे खूपच गरजेचे आहे. पोलीस हे लोकांच्या संपर्कात असल्याने लोकसेवक म्हणून त्यांच्यासाठी पोलिसांकडून

लोकांच्या अपेक्षा वाढल्या. त्यांना आपल्या वैचारिक आणि कौटुंबिक अडचणी बाजूला ठेवून स्वतःचे आरोग्य सांभाळून त्यांना आपली कामे पार पाडावी लागतात.

रोजगारी वाढती व्यसनाधीनता त्यामुळे लोक गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळत आहेत. आज समाजातील लोकांची वृत्ती ही काम न करण्याची बनत चालली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पोलिस कर्मचारी वर्ग अपुरा पडत आहे. त्यांना मोठ्या प्रमाणात शारीरिक व मानसिक तणावाला तोंड द्यावे लागत आहे. रात्र दिवस ते नागरिकांच्या रक्षणासाठी डोळ्यात तेल घालून पहारा देत असतात. असे असले तरी तेही समाजशील व्यक्ती आहेत आणि सनसनावळ्या, बंदोबस्त, यामुळे त्यांच्याकडून सुट्ट यांच्याही दिवशी काम करून घेतली जातात. १४-१४ तास ते आपले कर्तव्य पार पाडताना दिसून येतात. त्यामुळे त्यांना स्वतःच्या आरोग्याकडे पुरेसे लक्ष देता येत नाही. सोबतच त्यांच्या कुटुंबाकडे लक्ष देता येत नाही. कुटुंबाचा प्रमुख म्हणून मुलगा किंवा मुलगी म्हणून आईवडिलांकडे, आई-वडील म्हणून मुलाबाळांकडे लक्ष देऊ शकत नाहीत, कुटुंबांकडून वाढलेल्या अपेक्षा त्यांची पूर्तता करता येत नाही. कोरोना काळात तर तो मुद्दा प्रकर्षाने जाणवला. कर्तव्य करताना कधी रस्त्यावर तर कधी आरोग्य केंद्रात जाऊन आपल्या प्राणाची बाजी लावून कर्तव्य सुव्यवस्थितरित्या पार पाडली. त्यांच्यावर हल्ले झाल्याचे काही ठिकाणी निदर्शनास आले.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील करोना काळातील दगावलेल्या पोलीस कर्मचारी यांच्या संदर्भात असणाऱ्या कुटुंबाचे पुनर्वसन या बाबींचा व त्यामध्ये प्रशासनाची भूमिका यांचा प्रस्तुत अभ्यास संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील कोरोना काळातील मृत्यू झालेल्या पोलिस कर्मचारी यांच्या संदर्भात असणाऱ्या सर्व बाबींचा अभ्यास प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

विषय निवडीचा हेतू :

कोरोना कालावधीमध्ये महाराष्ट्र पोलीस व त्यांच्या कुटुंबांना खूप अडचणींना सामोरे जावे लागले. पोलिस कर्मचाऱ्यांना आपल्या कुटुंबापासून दूर रहावे लागले, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आणि यामध्ये पोलीस कर्मचारी यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले म्हणून सदरील संशोधनामध्ये त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने केलेल्या मदतीचा अभ्यास करणे. पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या आई-वडिलांपासून पती किंवा पत्नी पासून मुलाबाळांना पासून दूर राहून अहोरात्र सेवा दिली त्यांना शारीरिक मानसिक त्रास खूप सहन करावा लागला. पोलिस कर्मचाऱ्यांचा तुटपुंजा पगार त्यात त्यांना शासकीय निवासस्थानी राहण्यात त्यांचे निम्मे आयुष्य व्यतीत होते. करोना काळात शहीद झालेल्या कुटुंबीयांना शासनाने योग्य ठिकाणी किंवा त्यांच्या मूळगावी त्यांना विस्थापित करून येथे त्यांच्या राहण्याची सोय करणे हा संशोधन विषय निवडीचा उद्देश आहे.

समस्या सूत्रः

प्रस्तुत संशोधन कोरोना काळातील दगावलेल्या पोलिस कर्मचारी वर्गाच्या कुटुंबाचे असून पोलिस कर्मचारी यांना किती प्रमाणात फायदा झाला व यामध्ये किती कुटुंबांचे पुनर्वसन झाले. त्यासाठी कोणत्या समस्या उद्भवल्या त्या शोधण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची निवड केली आहे. पोलीस कर्मचाऱ्यांना खूप कमी पगार मिळतो त्या मध्ये त्यांचा परिवार चालवणे त्यांना खूप कठीण जाते व्यक्ती हा समाजशील प्राणी असल्याने त्यालाही आपल्या विचारांप्रमाणे घरबांधणी करावीशी वाटते. त्यामुळे त्यामुळे ह्या अपुरा पगार यामुळे काही कर्मचारी घर स्वतःचे घर बांधू शकत नाही किंवा विकत घेऊ शकत नाहीत. तर त्यांना स्वतःचे घर बांधणी करता यावी यासाठी पुरेसा निधी शासनाने देणे अपेक्षित असून ज्या पोलिस कुटुंबातील कर्मचारी दगावले असतील त्या कुटुंबांना योग्य ठिकाणी शासनाने विस्थापित करून त्यांना योग्य निवासस्थान उपलब्ध करून देऊन समाजामध्ये एक प्रतिष्ठा मिळवून देणे ही काळाची खूप मोठी गरज आहे. सध्या पोलिस कर्मचारी वर्ग हे खूप कमी प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे अस्तित्वात असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांवर खूप ताण येतो आणि त्यांना त्यांच्या आरोग्याकडे पूरेशा लक्ष देण्यासाठीही वेळ नाही.

संशोधनाची उद्दिष्टे :

१ महाराष्ट्रातील कोरोना काळातील परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेणे.

२ मराठवाड्यातील महाराष्ट्र पोलीस प्रशासनाने कोरोणा काळात केलेल्या कार्याचा सखोल अभ्यास करणे.

३ मराठवाड्यातील महाराष्ट्र पोलीस प्रशासनात कार्यरत एकूण पोलिस कर्मचारी व मृत पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचा सांख्यिकी अभ्यास करणे.

४ मराठवाड्यातील मृत्त पावलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पुनर्वसन झालेल्या कुटुंबाचा सखोल अभ्यास करणे.

५ केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील कोरोना काळातील परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी आरोग्यसेवा व इतर सर्वसाधारण पीडित कुटुंबियांसाठी आर्थिक तरतुदी चा अभ्यास करणे.

६ केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यातील महाराष्ट्र पोलिस प्रशासनातील कुटुंबियांच्या पुनर्वसनासाठी केलेल्या आर्थिक तरतुदीचा व सहायांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

१. महाराष्ट्र पोलीस प्रशासनाने कोरोना काळातील परिस्थिती अत्यंत चांगल्या प्रकारे हाताळली.

२. मराठवाड्यातील महाराष्ट्र पोलिस प्रशासनाला कोरोना परिस्थिती नियंत्रित करताना अनंत अडचणींना सामोरे जावे लागले.
३. मराठवाड्यातील कोरोना परिस्थितीने अत्यंत उग्र रूप धारण केले होते.
४. मराठवाड्यातील कोरोना परिस्थिती हाताळत असताना महाराष्ट्र पोलिस प्रशासनातील अनेक पोलिस कर्मचारी मृत पावली.
५. मराठवाड्यातील मृत पावलेल्या अनेक पोलिसांच्या कुटुंबीयांना आर्थिक ताण-तणाव सहन करावा लागला.
६. मराठवाड्यातील पोलीस प्रशासनाने पोलीस कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी शासनाकडून केलेली आर्थिक तरतूद व आर्थिक सहाय्य अत्यंत कमी आहे.
७. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यातील महाराष्ट्र पोलीस प्रशासनातील कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाकडून केलेल्या आर्थिक तरतुदीचा व सहायांचा अभ्यास करणे.
८. मराठवाड्यातील पोलीस प्रशासनात कोरोना काळात सेवा बजावत असताना मृत्यु झालेल्या कुटुंबांना शासनाकडून तात्काळ आर्थिक सहाय्य प्राप्त झालेले नाही.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन कार्यात सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. याबाबत या पद्धतीद्वारे विषयासंदर्भातील वास्तविक परिस्थिती काय आहे. याचा शोध घेतला जाणार आहे.

संशोधनाचे शीर्षक:

“कोरोनाकाळात दगावलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या पुनर्वसनात प्रशासनाची भूमिका विशेष संदर्भ मराठवाडा विभाग.” “coronakatat Dagavlelya Police karmcharyanchya kutumbachya punarvsanat prashasanachi bhumika vishesh sandarbh marathvada vibhag.”

संशोधनाचे स्वरूप:

संशोधनाचे स्वरूप सामाजिक शास्त्र पद्धतीचे असणार आहे. या संशोधन कार्यात विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीचा वापर तसेच ग्रंथालयीन पद्धतीचा वापर करून प्राथमिक व द्वितीय पद्धतीचा वापर करण्यात येईल.

अध्ययन क्षेत्र:

संशोधनाच्या व्याप्ती संदर्भात आज जगभरातील करोना काळातील गंभीर परिस्थिती आपण सर्वांनी पाहिली आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील दगावलेल्या पोलीस कर्मचारी यांच्या कुटुंबांच्या पुनर्वसनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :

संशोधकांनी निश्चित केलेल्या ग्रहितकांचा पडताळा घेण्यासाठी संबंधीत तथ्यांची माहिती मिळवावी लागते. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे. कोणतेही संशोधन हे तथ्यावर अवलंबून असते. त्यामुळे संशोधना मध्ये तथ्य संकलन करायला खुप महत्व आहे. तथ्य संकलनालाच संशोधनाचा आत्मा असे म्हणतात.

अ. प्राथमिक स्त्रोत :

संशोधकांनी प्रथम प्रयत्नातून जमविलेल्या सध्याला प्राथमिक तथ्ये म्हणतात. त्यासाठी ज्या पध्दतीचा अवलंब केला जातो, त्यास प्राथमिक स्त्रोत असे म्हणतात. तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतामध्ये प्रश्नावली मुलाखत अनुसूची निरिक्षण इ. स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत :

संशोधकाची स्वतःची जी तथ्ये नसुन अन्य व्यक्ती किंवा संस्था यांच्याव्दारे संकलीत केली जातात. त्यास व्दितीय तथ्य म्हणतात. त्यांच्या संकलनासाठी ज्या पध्दतीचा अवलंब केला जातो, त्यास द्वितीय स्त्रोत असे म्हणतात. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखाण अर्थसंकल्पातील माहिती नियतकालिके, मासिके, साप्ताहिक वर्तमानपत्र तसेच इंटरनेट या स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

व्दितीय स्त्रोतांचे प्रकार:

1.व्यक्तीगत कागदपत्रे यात आत्मचरित्रे दैनंदिनी पत्रे आठवणी, लेख इ.कागदपत्रे येतात .

2. सार्वजनिक कागदपत्रे शासकिय व इतर संस्थाचे अभिलेख पुस्तके, अहवाल, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, शिलालेख इ. सार्वजनिक कागदपत्रांचा समावेश यात होतो.

क. माहिती पृथःकरण :

माहिती पृथःकरणात खालील मार्गाचा अवलंब करण्यात येईल.

1. वर्णनात्मक व विश्लेषणात्मक

2.संगणकीकरण

ड. संशोधनाची उपयुक्तता :

संशोधन समस्येचा अभ्यास करत असताना संशोधनाचे सामाजिक दृष्ट्या महत्त्व व उपयुक्तता या बाबींचा विचार करताना हे संशोधन सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे व उपयुक्त असून ज्याचा समाजाच्या हितासाठी व कल्याणासाठी निश्चितच फायदा होईल. कोरोना महामारीमध्ये या कोविड-19 व्हायरसमुळे औद्योगिक, शैक्षणिक व इतर लहान-मोठ्या क्षेत्रांवर प्रचंड दुरगामी परिणाम झालेला आहे. यामुळे जागतिक स्तरावर व देश पातळीवर फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विकासाचा दर वाढविण्यासाठी शासनाने दिवसेंदिवस विविध मार्गाचा अवलंब करीत आहे. कोरोना काळात आरोग्य कर्मचारी, पोलिस कर्मचारी, आशा सेविका, शिक्षक या सर्वांना करोना काळातील युद्धे असे संबोधले जाते. कर्तव्य बजावत असताना एखादा कर्मचारी दगावला तर त्याच्या कुटुंबाच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम हाती घेतला जातो. कोरोना काळात दगावलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या पुनर्वसनात प्रशासनाची भूमिका विशेष संदर्भ मराठवाडा विभागाच्या प्रशासकीय अभ्यास करत असताना त्यांच्या कुटुंबाला पुढे जाण्यासाठी जे नुकसान झाले आहे. त्यातून त्यांचे मानसिक खच्चीकरण झालेले असून त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पुनर्वसनाच्या कार्यातून पुढे जाण्यासाठी त्यांना निश्चित फायदा होणार आहे. नव्याने उभारी देण्यासाठी कोरोना काळातील दोन वर्ष मानसिक खच्चीकरनातून त्यांना वर आणण्यासाठी व समाज व्यवस्थेमध्ये त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या संशोधन समस्येची उपयुक्तता आहे.

अध्ययनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधन कार्य हे मराठवाड्यातील संपूर्ण जिल्ह्यातील करोनामुळे दगावलेल्या पोलिसांच्या कुटुंबापुरताच मर्यादित राहील.

प्रकरण रचना :

१. प्रस्तावना.

करोना फॅमिली तील नवीन विषाणू ज्याचे नाव जागतिक आरोग्य संघटनेने covid-19 असे केले. ह्या महामारी बद्दल जगामध्ये कोठे उपचार पद्धती औषधे उपलब्ध नव्हती या महामारी ने अगदी गंभीररूप धारण केले. याचा सर्वप्रथम उगम चीन या देशात झाला तो खूप वेगाने सर्व जगामध्ये पसरला. जगामध्ये आणीबाणी लागू करण्याची वेळ आली. सर्व जगामध्ये टाळेबंदी लागू झाली. तरीही पोलिस प्रशासनाला रस्त्यावर उभा टाकून त्यांची ड्युटी करावी लागत होती. पोलीस प्रशासन यातून माघार घेतली नाही ते निडरपणे आपली सेवा देण्यास तत्पर होते. पोलीस कर्मचारी वेळेवर घरी जाऊ शकत नव्हते अशा परिस्थितीत त्यांचा कुटुंबाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही जे कर्मचारी करोना काळामध्ये सेवा देत

असताना दगावले. त्यांच्या कुटुंबियांच्या पुनर्वसनासाठी काय करता येईल. याचा अभ्यास करणे खूप गरजेचे आहे. दगावलेल्या कुटुंबीयांच्या सदस्यांचे पुनर्वसन करून समाजात मान मिळवून देणे खूप आवश्यक आहे.

२. संशोधन साहित्याचा आढावा :

करोना कालावधीमध्ये महाराष्ट्र पोलीस व त्यांच्या कुटुंबांना खूप अडचणींना सामोरे जावे लागले.पोलीस कर्मचाऱ्यांना आपल्या कुटुंबापासून दूर रहावे लागले.अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आणि यामध्ये पोलीस कर्मचारी त्यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले.म्हणून सदरील संशोधनामध्ये त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने केलेल्या मदतीचा अभ्यास करणे, पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या आई-वडिलांपासून पती किंवा पत्नी पासून मुलाबाळांपासून दूर राहून अहोरात्र सेवा दिली त्यांना शारीरिक मानसिक त्रास खूप सहन करावा लागला. पोलिस कर्मचाऱ्यांचा तुटपुंजा पगार त्यांना शासकीय निवासी स्थानी राहण्यात त्यांचे निम्मे आयुष्य व्यतीत होते. करोना काळात शहीद झालेल्या कुटुंबियांना शासनाने योग्य ठिकाणी किंवा त्यांच्या मूळ गावी त्यांना विस्थापित करून येथे त्यांच्या राहण्याची सोय करणे हा संशोधन विषय निवडीचा हेतू आहे.

३. कोरोना काळातील परिस्थिती चा अभ्यास.

जगामध्ये सर्वत्र डिसेंबर 2019 च्या नंतर करोना ह्या परिस्थितीने खूप गंभीर परिस्थिती निर्माण केली. तर या परिस्थितीच्या सर्व जगात सोबतच भारतावरील विपरीत परिणाम झाला. महाराष्ट्रामधील मराठवाडा विभागात खूप रुग्णसंख्या आढळली. एकंदरीतच आरोग्य प्रशासनाला साहाय्य करण्यासाठी पोलिस कर्मचारीही रस्त्यावर उभे टाकून सेवा देत होते आणि करोना प्रसार करण्यापासून रोखण्यासाठी प्रयत्न करत होते. ही सेवा देत असताना काही लोकांना स्वतःचा प्राण गमवावा लागला. त्यांच्यावर अवलंबून असलेले त्यांचे कुटुंब रस्त्यावर आले. समाजामध्ये त्यांना मानाचे स्थान मिळावे म्हणून त्यांच्या पुनर्वसनाचा अभ्यास करण्यासाठी हा आराखडा हाती घेतला आहे..

४. मराठवाड्यातील करोनाकाळात पोलीस प्रशासनातील मृत पावलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांचा सांख्यिकीय अभ्यास.

करोना काळात दगावलेल्या कर्मचाऱ्यांची आकडेवारी मिळविण्यासाठी मराठवाड्यातील आठ जिल्ह्याच्या पोलीस मुख्यालयाला भेट देऊन माहिती गोळा केली जाईल. व या माहितीच्या आधारे दगावलेल्या पोलिसांसंबंधित माहिती मुलाखती आधारे जिल्हा अधीक्षक कार्यालय, दवाखाने, येथून माहिती गोळा केली जाईल.

५. मराठवाड्यातील कोरोना काळात मृत पावलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या पुनर्वसनामध्ये प्रशासनाच्या भूमिकेचा अभ्यास.

करोना हा जग परिचित संसर्गजन्य आजार आहे. ज्याने सर्व जगाला ठप्प करून ठेवले आहे. माणसातील माणुसकीचे दर्शन घडविले. आरोग्य व्यवस्थेवर तर याचा खूप विपरीत परिणाम झालाच सोबतच पोलीस कर्मचाऱ्यांना ही करोनाची लागण झाली. त्यापैकी अगोदरच काही पोलिस कर्मचाऱ्यांच्या आरोग्य ठीक नसल्याचे कारणामुळे आजारी पडले आणि त्यांना या आजाराने ग्रासले या परिस्थितीत ते तग धरू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना त्यांचा प्राण गमवावा लागला. शासनाद्वारे खूप साऱ्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय रक्कमही मिळाली नाही जे कर्मचारी करोना ची लागण झाल्यामुळे दगावले त्यांच्या कुटुंबावर तर आभाळ कोसळले खूप वाईट परिस्थिती आली त्यांची कुटुंबे रस्त्यावर आली. अशा परिस्थितीत त्यांना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागला. पोलीस हे लोकांच्या संपर्कात आल्याने लोकसेवक म्हणून लोकांच्या पोलिसांकडून अपेक्षा वाढल्या. कामाचा प्रचंड व्याप सोबतच त्यांना आपल्या वैचारिक आणि कौटुंबिक अडचणी बाजूला ठेवून स्वतःचे आरोग्य सांभाळून त्यांना आपली कामे पार पाडावी लागतात. याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल व त्यांच्या पुनर्वसनासाठी काय काय उपाय योजना त्यांच्याकडून अपेक्षित आहेत यांचा अभ्यास करण्यात येईल.

६. निष्कर्ष व शिफारशी.

या संशोधन कार्यामध्ये करोना काळात दगावलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची मुलाखत घेऊन त्यांच्या समोरील अडचणी माहिती गोळा केली जाईल. शासनाने या कुटुंबीयांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे खूप गरजेचे आहे. व कुटुंबाच्या सध्याच्या राहण्याच्या ठिकाणाची माहिती मुलाखतीतून गोळा करून ती मांडली जाईल. भविष्यामध्ये ज्या पोलिस कर्मचाऱ्यांचा जो पुनर्वसनाचा प्रश्न असेल त्याचा एक प्रकारे सहाह्य व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

संदर्भसूची :

दक्षता मासिक पोलिसांबद्दल माहिती देणारे

वृत्तपत्रे :

१.सकाळ

२.लोकसत्ता

३.महाराष्ट्र टाइम्स

संशोधक विद्यार्थी
आनंद वैजनाथ साबणे

संशोधन मार्गदर्शक
प्रा.डॉ. बाळासाहेब सोनबा भिंगोले
एम.ए.,एम.फिल.,पिएच.डी.
सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधन मार्गदर्शक
श्री योगानंद स्वामी महाविद्यालय वसमत जि.हिंगोली.